# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २७/०१/२०२४

- दुखापत   :-
-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | खोलापुरी गेट 23/2024 कलम 326,504,506,34 भादवि | गांधी आश्रम अमरावती | दि 26.01.2024 चे 22/00 वा<br><br>दाखल - 27.01.2024- चे 01/18 वा. | अर्जुन जानरावजी इंगोले वय 38 वर्ष रा .गांधी आश्रम अमरावती | 1)करन संतोष थोरात वय 25 वर्ष 2) संतोष थोरात वय 45 वर्ष 3) सागर तायडे वय 35 वर्ष 4) दिपक ताडे वय 38 वर्ष सर्व रा. गांधी आश्रम अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी नामे अर्जुन जानरावजी इंगोले वय 38 वर्ष रा .गांधी आश्रम अमरावती हे नमुद घटना ता वेळी व ठिकाणी त्यांचे मोटर सायकलने गांधी आश्रम येथे घरी जात असतांना गांधी आश्रम येते चौकात आरोपी क्र 1 याने आवाज देवुन थांबविले तेव्हा फिर्यादी याने त्यास म्हटले की का थांबवले तेव्हा आरोपी क्र 2 याने फिर्यादीस म्हटले तु आमचे तक्रारी कायले करत.फिर्यादी याने त्यास म्हटले मी कायले तक्रारी करतो तेव्हा आरोपी क्र 3 व 4 आले चौघानी फिर्यादी सोबत वाद घावुन भांडण केले आरोपी क्र 1 याने हातातील तलवारीने फिर्यादीचे डोक्यावर वार केला तो वार फिर्यादीने डावे हाताने अडविला त्यामुळे फि चे डावे हाताला जखम होवुन रक्त निघाले आरोपी क्र 2 याने सुद्धा तलवार आणुन फि चे डोक्यावर मारण्याचा प्रयत्न केला तो वार फि ने डावे हाताने अडविला असता झालेल्या जखमेवर पुन्हा लागुन जखम खोल झाली जखमेतुन रक्ताची धार लागली आरोपी क्र 3 व 4 यांनी पाईप आनुण फि.स पाईपने पायावर पाठिवर मारहान केली. चारही आरोपीतांनी फि.स जीवे मारण्याचा प्रयत्न केला अशा जबानी सरिपोर्ट वरुन व मेडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ पळवुण नेणे :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अप क्र ७५/२४ कलम ३६३,५०६, ३४ भांदवि | अमरावती | २५.०१.२४ चे १४.३० वा दरम्यान दाखल ता वेळ २७.०१.२४ चे ००.३१ | एक महिला | १. पिडीत मुलीचे वडील<br>२. एक अनोळखी इसम | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी याचा आठ वर्षापासुन पाळणाघर चालवितात. त्याचे पाळणाघरामध्ये ८ मुले सांभाळण्यासाठी सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०७.०० वा पर्यत सांभाळण्याकरीता सदर मुलाचे पालक सोडुन जातात. पाळणाघरातील एक मुलगी वय ३ वर्ष ही सुमारे दीड वर्षापासुन फि चे पाळणाघरात येत होती सदर मुलीचे आईने सांगितले होते की, माझी व मुलीचे वडील यांचे मध्ये न्यायालयात कौटुबित हिसाचाराचे प्रकरण चालु असुन मुलीचा ताबा मा न्यायालयाने मला दिलेला आहे. तरी तुम्ही मुलीला चांगले सांभाळा तिचे वडीलाकडे देवु नका असे फि त्यांनी सांगितले होते. परंतु मुलीचे वडील अधुन मधुन पाळणाघरात मुलीला भेटण्याकरीता येत जात असत. दि २५.०१.२०२४ रोजी सकाळी १०.१५ वा सुमारास मुलीच्या आईने मुलीला पाळणाघरात आणुन सोडले होते. त्यानंतर दुपारी १४.३० वा च्या सुमारास मुलीचे वडील पाळणाघर येथे आले त्यावेळी मुलगी जेवण करीत होती तिचे वडील तिला दिसताच ती त्याचेकडे पळत गेली. त्यानी तीला कडेवर घेतले व फि स म्हणाले की, माझ्या बरोबर स्कुटीवर आलेले नातेवाईक यांना मुलीस दाखवितो व परत घेवुन येतो असे म्हणाल्याने फिर्यादीने त्याना म्हटले की दादा तुम्हाला बाहेर भेटण्याची परमिशन नाही तुम्ही आतमध्ये येवुन बोला असे त्याना बोलताच मुलीला ते बाहेर घेवुन गेले व म्हणाले की, तुम्ही पोलीसमध्ये जर रिपोर्ट दिला तर मी पाहुन घेईल असे फिर्यादीस म्हणुन ते दोघे मुलीस स्कुटीवर बसवुन घेवुन निघुन गेले त्यावेळी पाळणाघरात मुलांना सांभाळ करणारी ताई ही होती व तिने सदरची घटना पाहली आहे तसेच नंतर फि ने मोबाईलवर मुलीचे आईला सदरची माहीती दिली. मुलीचे आईने तिचे वडीलाला फोन लावला असता त्यांनी सांगितले की मी मुलीला कचोरी खावु घालुन आणतो असे म्हणाले व आज पावेतो मुलीला पाळणाघरात आणुन सोडले नाही किवा तिचे आईचे ताब्यात दिले नाही अशा फिर्यादीचे जबानी रिर्पोटवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ गैरकायदा मंडळी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १००/२०२४ कलम १४३.१४६. १४७ १४८ ४२७ भादवी | आराधना चौक कठोरा जकात नाका अमरावती | दि २७.१.२०२४ चे ०७.१० वा दि २७.१.२०२४ चे १०.१० वा | भुषन वासुदेवराव मोरे वय २४ धंदा शेती रा टाकळी जहागीर हनुमान मंदीर जवळ अमरावती | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की आज रोजी २७.१.२०२४ रोजी सकाळी ०७.१० वा मीनीटांना मी माझ्े दोन मीत्र हीरो होन्डा ड्रीम युगा माटार सायकल नी अमरावती वरून टाकळी येथे गावी जात असता जकात नाका जवळ चार चाकी बलेनो पीकअप वाहन वेघाने नवसारी रींग रोड कडे जातांना दीसल्याने व त्यात गोवंश जनावरे असल्याची खाञी झाल्याने मी ११२ क्र वर फोन वरून माहीती दीली . लगेच चौकात एक बलेनो नेवी ब्लु रंगाची आराधना चौकात आम्ही थांबलेल्या ठीकानी आली व सहा ते सात जण त्या गाडीमधुन लाठी दंडे घेवुन उतरले असता आम्ही घाबरलो व तेथुन पोटे हाउसशीग कडे जाणारे रोडने पळालो असता त्या ठीकानी माझ्े मीत्रांची उभी असलेली मोटर सायकल ची त्यांनी लाठी दंडे मारून तोडफोड करण्यास सुरूवात केली. साधारन ता दहा मी. ने मला माझ्े मोबाइलने पोलीसांचा फोन आला व त्यांनी मला सांगीतले की ते जकात नाका आराधना चौक येथे आले आहे त्यावेळी माझे मीत्रासह त्याठीकानी गेलो आणी पोलीसांना घटना सांगीतली. माझ्े मोटरसायकलची पाहनी केली असता मोटार सायकल हेडलाईट इंडीकेटर समोरील नंबर पलेट व काही फायबरचे स्पेअर पार्ट की अं १०,००० रू चे तोडफोड करून नुकसान केल्याचे दीसुन आले तरी नेव्ही ब्युल रंगाच्या कार मध्ये सहा ते सात इसम ज्यापैकी एक इसम वय ३० जाडया शरीर अंगात नीळे रंगाचा शर्ट घातलेला दुसरा मुलगा वय अं २० ते २५ अंगात लाल टी शर्ट घातलेला सडपातळ तीसरा मुलगा वय २५ ते ३० वयोगटातील मध्यम बांधा अंगात काळे रंगाचे जॅकेट घातलेला व इतर चार इसम र्वणन लक्षात नाही त्यांनी माझेवर लाठी काठया घेवुन हल्ला करण्याचा प्रयत्न केला आम्ही मोटर सायकल पडाल्याने मोटर सायकल तोडफोड करून अंदाजे १०,००० रू चे नुकसान केले वरून सदर चा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | खोलापुरी गेट अप क्र 24/2024 कलम 379 भादवी | साबनपुरा मस्जिद अमरावती | 25/1/24 चे 08.15 वा दाखल ता वेळ दि 27/1/2024 चे 13.40 वा | उमेर रजा खान मुख्तार खान वय 24 वर्ष रा काजीपुरा अंजनगाव सुर्जि अम | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी यांनी पो स्टे ला रिपोर्ट दिला की साबनपुरा मस्जिद येथे नमाजसाठी आले व वजु करत असतांना त्यांनी त्याची बॅग बाजुने ठेवेली व त्यानंतर पाहीले असता त्यांना त्यांची बॅग दिसली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली वरुन पो स्टे ला सदरचा गुन्हा दाखल |

➢ फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | खोलापुरी गेट 25/2024 कलम 419,420,34 भादवी | अमरावती | 27/1/2024 चे 12.30 ते 12.45 वा<br>दाखल ता वेळ 27/1/2024 चे 15.55वा | एक महिला | दोन अनोळखी मुले वय अंदाजे 25 ते 30 वयोगटातील | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद फिर्यादी नमुद घटना ता वेळी व ठिकाणी रस्त्याने घरी पायदळ जात असतांना रंगाली गल्ली येथे फि ला दोन मुले भेटले त्यांनी फि ला म्हटले की गरीबांना प्रसाद भेटत आहे म्हणुन फिर्यादी ही त्यांचे मागे रंगारी गल्ली जगन्नाथमंदिर येथे गेली असता तिला तेथेच बसुन ठेवले व म्हटले की गरीबांच्या हातात पाटल्या पाहीजे नाही म्हणुन फिर्यादीने तिच्या हातातील पाटल्या काढल्या व ब्लाउज मध्ये ठेवत असतांना त्यांनी म्हटले की तुम्ही जवळ ठेवु नका फिर्यादी जवळुन चांदिच्या पाटल्या वजन 15 तोळे कि अं 10000 रु चे फिची फसवणुक करुन पळुन गेले त्यांचे वर्णन एक मुलगा उंच व दुसरा ठेंगणा त्याचे उजवे कानात बाही होती तेथुन पळुन गेले अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |